C/13

No. CHE/DP/107/Gen
2019-20

**MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI**

**Chief Engineer (Development Plan) Department**

**No: Ch.E./DP/ 31281 /Gen dt. of 05/03/2020**

# CIRCULAR

Sub :- Ease of Doing Business
- modality of excavation permit in case of building proposals within the jurisdiction of Greater Mumbai.

Ref :-
1. Government Circular from Revenue and Forest Department, Sate Government vide no. गौखनि १०/०२२०/प्र. क्र. ७२/ख-२ दि. २४/०२/२०२०
2. MGC/

The Revenue and Forest Department, Sate Government of Maharashtra vide Government Circular u/no. गौखनि १०/०२२०/प्र. क्र. ७२/ख-२ दि. २४/०२/२०२० have issued directions regarding modality of excavation permit in case of building proposals within the jurisdiction of Greater Mumbai.

As per the circular, the Collector's office has been integrated with the Online Building Proposal Approval System of MCGM and intimation regarding earth/material excavation is provided online to the Collector. Hence no separate intimation regarding excavation on site needs to be given to Collector office. Further, if the excavated earth/material is used on the same site, intimation of excavation is not required. However, if the excavated earth/material is being transported elsewhere then in that case the necessary payment towards royalty is required to be made online through OBPS of MCGM which will enable to issue transport permit through online system as the OBPS of MCGM is now integrated with web site of Revenue Department.

The copy of Government Circular issued by Revenue and Forest Department; Sate Government of Maharashtra vide Government Circular u/no. गौखनि १०/०२२०/प्र. क्र. ७२/ख-२ दि. २४/०२/२०२० shall be referred and followed scrupulously.

04/03/2020

**(Vinod Chithore)**
**Ch.Eng (D.P.) & Director (ES&P)**

**(Pravin Pardeshi)**
**Hon-ble Municipal Commissioner**

**बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील भूखंड विकासाकरीता गौण खनिज उत्खनन व वाहतूकीची परवानगी देण्याबाबत दिशानिर्देश / सूचना...**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः गौखनि १०/०२२०/प्र.क्र.७२/ख-२**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,
तारीखः २४/०२/२०२०.

वाचा :-

१) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/०८१२/प्र.क्र.६१३/ख, दिनांक १८/०७/२०१३

२) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/१०१२/प्र.क्र.६०३/ख, दिनांक ११/०५/२०१५.

३) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/१०१२/प्र.क्र.६०३/ख, दिनांक १५/१०/२०१५.

४) शासन अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक गौखनि १०/०३१६/प्र.क्र.४७२/ख, दि. १२/०१/२०१८.

**-: शासन परिपत्रक :-**

राज्य शासनाने संदर्भ क्र. १ वरील अधिसूचनेन्वये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ अधिसूचित करुन, दिनांक १९/०८/२०१३ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द केले आहेत. सदर नियम दिनांक २४/१०/२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्यात दिनांक २४/१०/२०१३ पासून लागू करण्यात आलेले आहेत. तसेच संदर्भ क्र. २ वरील शासन अधिसूचना दिनांक ११/०५/२०१५ अन्वये एखाद्या भूखंडाचा विकास करताना मातीचे उत्खनन करुन ती माती त्याच भूखंडाच्या विकासप्रक्रीयेत वापरल्यास अशा मातीवर स्वामित्वधन भरले जाणार नाही. तसेच संदर्भ क्र. ३ अन्वये भूखंड या शब्दाच्या व्याख्येबाबत असे स्पष्टीकरण करण्यात आले आहे की, ज्या भूखंडावर विकास करावयाचा आहे तो सलग व एकच असणे आवश्यक असून, त्या भूखंडावर विकास करण्यासाठी समुचित नियोजन प्राधिकरणाने किंवा यथास्थिती जिल्हाधिकारी यांनी परवानगी दिलेली असणे अथवा अकृषक परवानगी दिलेली असणे अनिवार्य आहे. तसेच संदर्भ क्र. ४ येथील अधिसूचनेन्वये महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ४६ मधील उपनियम (एक) खाली नवीन परंतुक समाविष्ट करुन, भूखंड विकासाकरीता आवश्यक परवानगी प्राप्त झाल्यानंतर विकासानुषंगिक उत्खननाविषयी अवलंबवावयाची कार्यपध्दती विषद करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ज्या प्रकल्प प्रस्तावकास आवश्यक ती परवानगी मिळालेली असते त्या प्रकल्प प्रस्तावकाच्या मंजूर बांधकाम आराखड्याची प्रत संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडे महानगरपालिकेच्या Online Building Plan Approval System या प्रणाली द्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रेषित

केली जाते. सदर मंजूर बांधकाम आराखड्यात नमूद केल्यानूसार किती उत्खनन आवश्यक आहे त्यानूसार आवश्यक तितक्या परिमाणाइतकेच गौण खनिजाचे उत्खननावर स्वामित्वधन उक्त प्रणालीतून ऑनलाईन पद्धतीनेच विकासकामार्फत भरण्याची सोय आहे. त्यामुळे सदर प्रणालीतून ही कार्यवाही झाल्यानंतर महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ मधील नियम ४६ मधील उपनियम (एक) नूसार परत जिल्हाधिकारी यांना कळविण्याची गरज उरत नाही.

तेव्हा बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ज्या प्रकल्प प्रस्तावकास भूखंडाच्या विकासाची परवानगी मिळाली असेल, व विकास प्रक्रियेदरम्यान उत्खनन केलेल्या गौण खनिजाची अशा भूखंड क्षेत्राच्या बाहेर वाहतूक करावयाची असल्यास अशा प्रकल्प प्रस्तावकामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ऑनलाईन प्रणाली MCGM “Online Building Plan Approval System” यातून आवश्यक असलेल्या गौण खनिजाच्या उत्खननापोटी स्वामीत्वधनाची रक्कम ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी. जेणेकरुन विकासानुषंगिक गौण खनिजाच्या वाहतूकीसाठी वाहतूक परवाने सदर प्रणालीतून ऑनलाईन पद्धतीनेच निर्गमित करता येतील.

अशा प्रकारे प्रकल्प प्रस्तावकास भूखंडाचा विकास करताना गौण खनिजाच्या उत्खननासाठी उत्खनन/वाहतूक परवाना घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतंत्रपणे अर्ज सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२००२२४१७५७४३५३१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh Rohidas Chavan

**( दिनेश चव्हाण )**
शासनाचे अवर सचिव

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन मलबार हिल मुंबई. (पत्रान्वये)
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. राज्यमंत्री (महसूल) महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

८) विभागीय आयुक्त कोकण.
९) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर,
१०) जिल्हाधिकारी मुंबई शहर/ मुंबई उपनगर.
११) निवडनस्ती "ख" कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.